**<u>प्रेस नोट</u>**

## एमएचटी- सीईटी २०१८ ची Answer Key आणि OMR उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना उपलब्ध

राज्यातील व्यावसायिक तांत्रिक पदवीपूर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली एमएचटी- सीईटी २०१८ हि परीक्षा दिनांक १० मे २०१८ रोजी राज्याच्या ३६ जिल्ह्यामध्ये १२६० केंद्रावर घेण्यात आलेली होती व ४३५६०६ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केलेली आहे. या परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे पदवीपूर्व प्रथम वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान अभ्यासक्रम, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम व कृषी अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्यात येणार आहेत.

या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांची उत्तर सूची (Answer Key) राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर दि. २५ मे २०१८ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. प्रश्न पत्रिका संदर्भात किंवा Answer Key संदर्भात विद्यार्थ्यांच्या काही हरकती असल्यास त्यांनी त्या दि. २५ मे २०१८ ते २७ मे २०१८ या कालावधीमध्ये त्यांच्या लॉगईन द्वारे ऑनलाइन पद्धतीने सादर कराव्यात. इतर कोणत्याही माध्यमातून प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची म्हणजेच OMR ची स्कॅन केलेली प्रत सुद्धा त्यांच्या लॉगईन मध्ये दि. २६ मे २०१८ पासून दि. २ जुन २०१८ व दि. ५ जून २०१८ पासून दि. ७ जुन २०१८ पर्यंत उपलब्ध असतील.